**परिपत्रक** (नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेसाठी)

प्रति,

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद परिक्षेत्रात नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेसाठी अर्ज सादर करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांचे

**मा. अध्यक्ष तसेच मा. सचिव**..................

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेसाठी अर्ज सादर करणेबाबत.

**संदर्भ :-** १) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्यांना मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करण्याबाबत....दि. १३ सप्टेंबर २०१७ चे शासन निर्णय

२) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालयांना (पारंपारिक व व्यावसायिक) मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करण्याबाबत...दि. १५ सप्टेंबर २०१७ चे शासन निर्णय

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार तसेच उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेसाठी नोंदणीकृत संस्थाकडून विहित नमुन्यात ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्जावर संदर्भिय शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार विद्यापीठामार्फत उपरोक्त संदर्भात आपणास कळविण्यात येते की:-

१) नोंदणीकृत संस्थांनी विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर home Page वरील Affiliation Portal या Link वर Click करुन Proposal Guidelines २०१८-१९ येथे Click करुन त्यातील सूचनेनुसार ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. आपल्या माहितीसाठी सदर ठिकाणी helpline देण्यात आलेली आहे. तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय विद्यापीठाची बृहत आराखडा, संलग्नता शुल्काचा तक्ता, प्रकिया शुल्काचे परिपत्रक, वेळापत्रक व इतर सविस्तर माहिती आणि संबंधीत परिपत्रक Import G.R. / Circulars या लिंकवर देण्यात आलेली आहे. ऑनलाईन अर्जासाठी प्रथम संकेतस्थळावर नोंदणीकरुन प्रक्रिया शुल्काचा भरणा करुनच ऑनलाईन प्रणाली मार्फत अर्ज सादर करावेत.

२) नोंदणीकृत संस्थांनी विषयाकरीता अर्ज भरतांना संस्थेची व प्रस्तावित महाविद्यालये/परिसंस्थेचे संपूर्ण माहिती व्यवस्थितरित्या भरून ऑनलाईन प्रणालीद्वारे Send करावी.

३) विद्यापीठाच्या बृहत आराखड्यामध्ये नमूद केलेल्या तक्त्यातील रकान्याप्रमाणे आपणास लागू असलेले प्रकिया शुल्क भरणे आवश्यक आहे. त्यानंतरच आपणास हव्या असलेल्या Link Activate होऊन आपणास हवा असलेला अर्ज ऑनलाईन प्रणालीमार्फत भरता येईल. सदरचे शुल्क हे लवकरात लवकर परंतू दिनांक ३० सप्टेंबर पावेतो भरल्यास आपणास आवश्यक Link उपलब्ध होऊन परिपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रत आवश्यक त्या कागदपत्र व संलग्नता शुल्कासह राष्ट्रीयकृत बँकेमध्ये भरूण त्याची एक प्रत लेखा विभागाकडून शुल्क जमा झाल्याची खात्री करुन शैक्षणिक विभागात चलनाच्या प्रतीसह प्रस्ताव सादर करावा तसेच लेखा विभागाच्या चलनाची प्रत लेखा विभागात सादर करुन पोच घ्यावी.

४) नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेसाठी विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरून त्याची प्रिंट घेऊन सदर अर्ज ०६ प्रतीत संदर्भिय शासन निर्णयात व ऑनलाईन प्रणालीत नमूद केलेली कागदपत्र व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात सादर करावेत.

५) उपरोक्त अर्ज सादर करतांना संदर्भिय शासन निर्णयात नमूद केलेल्या बाबींची पुर्तता करणे अनिवार्य असून अपूर्ण भरलेले अर्ज, अपूर्ण कागदपत्र या तत्सम बाबी आढळल्यास अशा अर्जावर विद्यापीठामार्फत कार्यवाही केली जाणार नाही, त्या संदर्भातील संपूर्ण जबाबदारी नोंदणीकृत संस्थेची असेल, याची कृपया नोंद घ्यावी.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी सध्या संलग्न असेलेल्या महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन विषय/अभ्यासक्रम, नवीन विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी, विद्यार्थी संख्यावाढ/सेकंड शिफ्ट इत्यादीबाबतचे विस्ताराचे विहित नमुन्यातील अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने भरून त्याची प्रिंट घेवून सदर अर्ज दोन प्रतित आवश्यक त्या कागदपत्र, प्रक्रियाशुल्क व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावेत.

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी सध्या संलग्न असलेल्या महाविद्यालयांनी/मान्यता प्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन नैसर्गिक विस्ताराचे विहित नमुन्यातील अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने भरून त्यांची प्रिंट घेवून सदर अर्ज सहा प्रतित आवश्यक त्या कागदपत्र, प्रक्रियाशुल्क व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावेत.

८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी सध्या संलग्न असलेल्या महाविद्यालयांनी/मान्यता प्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे विहित नमुन्यातील अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने भरुन त्याची प्रिंट घेऊन सदर अर्ज दोन प्रतित आवश्यक त्या कागदपत्र, प्रक्रियाशुल्क व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावेत.

९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी सध्या संलग्न असलेल्या महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन कायम संलग्नीकरणाचे विहित नमुन्यातील अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने भरून त्यांची प्रिंट घेऊन सदर अर्ज दोन प्रतित आवश्यक त्या कागदपत्र, प्रक्रियाशुल्क व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावेत.

आपणास ज्या वर्षाकरीता अर्ज सादर करावयाचा आहे, त्या वर्षाच्या अधिच्या वर्षी दि. ३० सप्टेंबर पूर्वी अर्ज सादर करण्यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ मधील तरतूद नमुद करण्यात आलेली आहे. तथापि, संलग्नीत महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था मार्फत सादर होणाऱ्या विविध अर्जांचा विचार करता तसेच शासकीय सुट्ट्या लक्षात घेता, आपण सादर केलेले अर्ज तपासून जमा करुन घेणे, यासाठी घाई होऊन अर्जात अपूर्णता अथवा त्रुटी राहू शकतील आणि आपल्या अर्जावर योग्य रितीने कार्यवाही होणार नाही तसेच आवश्यक ती माहिती शासनाकडे पाठविणे अडचणीचे होईल. सबब, आपण आपले अर्ज लवकरात लवकर सादर करावेत, जेणेकरुन त्यातील त्रुटीचे निराकरण करुन आपणास परिपुर्ण अर्ज विहित मुदतीत सादर करता येऊ शकतील.

ऑनलाईन प्रणालीद्वारे माहिती भरतांना वा आपणास काही अडचणी असल्यास सदर अडचणींचे निराकरण करणेसाठी वर नमूद केलेल्या लिंक वर Helpline देण्यात आलेली असून आपण त्या ठिकाणी देण्यात आलेल्या दूरध्वनी/मोबाईलवर संपर्क साधल्यास आपल्या अडचणीचे तात्काळ निराकरण केले जाईल.

अर्ज सादर करण्यासाठी वर नमुद केलेल्या Link मधील सुचना, या पत्रासोबत जोडलेल्या सूचना तसेच संदर्भिय शासन निर्णयांचे अवलोकन करुन कृपया आपण आपले अर्ज सादर करावेत, ही विनंती.

कळावे,

**प्राध्यापक वाल्मिक सरवदे**
विशेष कार्य अधिकारी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

(टीप :- सदरील प्रस्तावास विद्यापीठ अधिनियमात वेळोवेळी होणारे बदल लागु राहतील)